पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगाव, सोलापूर - 413 255, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७०/७१/७२/७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: affiliation@sus.ac.in विस्तारित क्र.: १२२



**संलग्नता विभाग**

**जा. क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२४-२५/**5210 **दिनांक:** 22 JUL 2024

प्रति,

**मा. प्राचार्य/संचालक/सचिव,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय : महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून पदवी व पदव्युत्तर पदवी स्तरावरील नवीन अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी / संलग्निकरणाचा विस्तार / संलग्निकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार / निरंतर संलग्निकरण / महाविद्यालयीन नावातील बदल / महाविद्यालय बंद / अभ्यासक्रम बंद तसेच व्यवस्थापन हस्तांतरण करण्यासंदर्भातील प्रस्तावाबाबत...**

**संदर्भ :** १) मा. कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे दिनांक १४/०६/२०२४ रोजीच्या ई-मेल अन्वये प्राप्त पत्र क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१००/ विशि-२, दिनांक १४/०६/२०२४.

२) मा. उप सचिव (कराधान), वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे दिनांक १४/०६/२०२४ रोजीच्या ई-मेल अन्वये प्राप्त पत्र क्र. संकीर्ण-२०२४/अनौ सं.क्र.०१/ कराधान-१, दिनांक २९/०४/२०२४.

३) मा. सह आयुक्त राज्य कर विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक १४/०६/२०२४ रोजीच्या ई-मेल अन्वये प्राप्त पत्र क्र. JCHQ-१/(AR-५)/GST/Affiliation fee/ADM-८/B-०९, दिनांक २४/०४/२०२४.

४) मा. प्र. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ यांची दिनांक १०/०७/२०२४ रोजीची अंतर्गत कार्यालयीन टिपणी.

५) विद्यापीठाचे परिपत्रक क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/जीएसटी/२०२४-२५/५०४३, दिनांक १२/०७/२०२४.

६) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरुप परिनियम, २०२२.

महोदय / महोदया,

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य / संचालक / सचिव यांना कळविण्यात येते की, खालील तक्त्यामध्ये नमूद प्रमाणे नवीन अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी / संलग्निकरणाचा विस्तार / संलग्निकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार / निरंतर संलग्निकरण / महाविद्यालयीन नावातील बदल / महाविद्यालय बंद तसेच अभ्यासक्रम बंद करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ (२) नुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून पदवी व पदव्युत्तर स्तरावरील नवीन अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासंदर्भातील प्रस्ताव तसेच संलग्निकरणाचा विस्तार (विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढ) / संलग्निकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार आणि निरंतर संलग्निकरण इत्यादी संदर्भातील प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम कलम

११४ अन्वये महाविद्यालये / संस्थांनी विद्यापीठाकडे सादर करण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर, २०२४ आहे. यानुसार महाविद्यालय / संस्थांनी सबंधित प्रस्ताव विद्यापीठ कार्यालयाकडे विहीत वेळेत, विहीत नमुन्यात व विहीत शुल्कासह सादर करावेत.

२) विद्यापीठ अनुदान आयोग (महाविद्यालयांचे विद्यापीठाशी संलग्निकरण) अधिसूचना २००९ व शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/ (२०८/१७) / मशि - ४, दि. १३/०९/२०१७ नुसार सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून विद्याशाखा, नवीन विषय/अभ्यासक्रम, अतिरिक्त तुकडया इ. मंजूरी देण्यासाठी अर्ज मागविण्याची कार्यपध्दती निश्चित केली असून संलग्नित महाविद्यालयांनी सदर शासन निर्णयामध्ये विहीत केलेल्या नमून्यामध्ये व कार्यपध्दतीनुसार सर्व प्रकारचे प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावेत. शासन निर्णयातील कार्यपध्दतीची पूर्तता करणारेच प्रस्ताव विद्यापीठाकडे स्वीकारले जातील.

३) अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी, प्रवेश क्षमता वाढ सुरु करण्यास्तव प्रस्ताव सादर करतेवेळी अर्जातील नियमावलीनुसार सर्व बाबींची पूर्तता करुनच आवश्यक त्या सहपत्रासह प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावा. अपूर्ण प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. (प्रस्ताव सादर करण्यापूर्वी संलग्नता विभागाकडून तपासणी करून सादर करावे.)

४) विहीत मुदतीत न आलेल्या नवीन संलग्निकरण / नवीन विषय / अभ्यासपाठ्यक्रम / विद्याशाखा / अतिरिक्त तुकडीच्या प्रस्तावांसंदर्भात तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालय / संस्थेवर राहील, याची नोंद घ्यावी.

५) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासूनच्या पदवी व पदव्युत्तर स्तरावरील नवीन संलग्निकरण (महाविद्यालय, अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी, प्रवेश क्षमता वाढ) / संलग्निकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार / निरंतर संलग्निकरण / महाविद्यालयांच्या नावातील बदल / महाविद्यालय व अभ्यासक्रम बंद करणेबाबत सादर करावयाच्या प्रस्तावांचे विहीत नमुन्यातील अर्ज विद्यापीठ संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

६) नवीन अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, प्रवेश क्षमता वाढ, अतिरिक्त तुकडी सुरु करावयाचे व संलग्निकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्ताराचे / निरंतर संलग्निकरण / महाविद्यालयांच्या नावातील बदल / महाविद्यालय व अभ्यासक्रम बंद करणेबाबत प्रस्ताव पाठविण्याबाबतच्या सविस्तर सूचना सोबत जोडलेल्या आहेत. सदर सूचनांचे व प्रस्ताव सादर करावयाच्या अर्जासोबत दिलेल्या नियमावलीचे तंतोतंत पालन करावे.

७) तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२१ (२) मधील तरतूदीनूसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून महाविद्यालय, विद्याशाखा, अभ्यासपाठ्यक्रम, विषय व तुकडी बंद करण्याबाबतचे प्रस्ताव दि. ३१/०७/२०२४ पूर्वी सादर करावेत. तद्नंतर प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

८) महाविद्यालयाच्या नावातील बदलांचे (जुने नाव - नविन नाव) प्रस्ताव दि. ३१ ऑक्टोंबर, २०२४ पर्यंतच सादर करावे. तद्नंतर प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

९) संदर्भ क्र. ६ अन्वये कोणत्याही संलग्न महाविद्यालयाचे किंवा परिसंस्थेचे विद्यमान व्यवस्थापन, कोणत्याही संलग्न महाविद्यायालच्या किंवा यथास्थिति, मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्यासाठी परवानगी देण्याकरिता ज्या वर्षात व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्याची मागणी केली आहे त्या वर्षाच्या पूर्ववर्ती वर्षाच्या सप्टेंबरच्या शेवटच्या दिवसापूर्वी विहित शुल्कासह विहित नमूना क्रमांक एक व दोन मध्ये प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | प्रस्तावाचा प्रकार | विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख | विद्यापीठास सादर करावयाच्या प्रस्तावाच्या प्रती | नियमित शुल्क | विलंब शुल्क (प्रतिमाह) | प्रस्तावाच्या अर्जाचा नमुना |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव | ३० सप्टेंबर, २०२४ (महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११४ नुसार) | ०१ | सोबत स्वतंत्र परिशिष्ट जोडलेले आहे. | १०००/- | विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Application & Forms या मथळ्याखाली व Academic Research and Development अंतर्गत AFFILIATION SECTION या मथळ्याखाली उपलब्ध आहेत. |
| २. | नैसर्गिक विस्तार (पारंपारिक अभ्यासक्रम) | | ०२ | | | |
| ३. | नैसर्गिक विस्तार (व्यावसायिक अभ्यासक्रम) | | ०५ | | | |
| ४. | निरंतर संलग्निकरण | | ०२ | | -- | |
| ५. | महाविद्यालय, विद्याशाखा, अभ्यासक्रम, तुकडी बंदचे प्रस्ताव | १ ऑगस्ट, २०२४ (महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२१ (२) नुसार) | ०२ | | -- | |
| ६. | महाविद्यालयाच्या नावातील बदलाचे प्रस्ताव | ३१ ऑक्टोबर, २०२४ (विद्यापीठाने तयार केलेल्या नियमावलीनुसार) | ०२ | | -- | |
| ७. | नवीन अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी, संलग्निकरणाचा विस्तार (विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढ)- **पारंपारिक अभ्यासक्रम** | ३० सप्टेंबर, २०२४ (महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११४ नुसार) | ०३ | | १०००/- | |
| ८. | नवीन अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी, संलग्निकरणाचा विस्तार (विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढ)- **व्यावसायिक अभ्यासक्रम** | ३० सप्टेंबर, २०२४ (महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११४ नुसार) | ०५ | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९) | कोणत्याही संलग्न महाविद्यालयाचे किंवा परिसंस्थेचे विद्यमान व्यवस्थापन, कोणत्याही संलग्न महाविद्यायालच्या किंवा यथास्थिति, मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरणाबाबत. | ३० सप्टेंबर, २०२४ ( महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरुप परिनियम, २०२२ ) | ०३ | रुपये २५०००/- इतके शुल्क व परिनियम ज्या वर्षात शासकीय राजपत्रात प्रसिध्द केले आहेत त्या वर्षानंतर दरवर्षी दहा टक्के वाढ राहील. | -- | -- |

अभ्यासपाठ्यक्रमाच्या संलग्निकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्ताराचे / निरंतर संलग्निकरण / महाविद्यालयाच्या नावातील बदल / महाविद्यालयातील विषय/ अभ्यासपाठ्यक्रम / अतिरिक्त तुकडी / विद्याशाखा / महाविद्यालय बंद करणेबाबत प्रस्ताव पाठविण्याबाबत सविस्तर सूचना सोबत जोडलेल्या आहेत. सदर सूचनांचे व प्रस्ताव सादर करावयाच्या अर्जासोबत दिलेल्या नियमावलीचे तंतोतंत पालन करावेत.

उपरोक्त परिपत्रकामध्ये नमूद अंतिम तारखेदिवशी सार्वजनिक सुट्टी अथवा विद्यापीठाने जाहिर केलेली सुट्टी असेल तर सदर दिवशीनंतर येणारा दिवस ही अंतिम तारीख समजण्यात येईल.

संदर्भ क्र. १ ते ४ च्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांनी राज्यकर विभागाकडून मागविलेल्या अहवालानुसार संलग्नता शुल्कावरील वस्तू व सेवा कर भरण्याबाबतच्या महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र. १ अन्वये दिलेल्या सूचनेनुसार संलग्नता शुल्काच्या रक्कमेवर १८% वस्तू व सेवा कर (GST) ची अतिरिक्त रक्कम विद्यापीठाकडे भरणा करण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे संदर्भ क्र. ५ अन्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार विहित कार्यवाही करण्यात यावी.

( डॉ. यु. व्ही. मेटकरी )
उपकुलसचिव, संलग्नता विभाग

**प्रत :** वित्त व लेखा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना

१) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून पदवी व पदव्युत्तर स्तरावरील नवीन अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासंदर्भातील प्रस्ताव तसेच संलग्निकरणाचा विस्तार (विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढ) / संलग्निकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार आणि निरंतर संलग्निकरणाचे प्रस्ताव स्वीकारण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर, २०२४ आहे. उक्त संदर्भातील प्रस्ताव सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आवश्यक त्या शुल्कासह **दि. ३० सप्टेंबर, २०२४ पूर्वी आवश्यक ती माहिती विद्यापीठाकडे (A४) पेपर साईज मध्ये DVBW-TTSurekh या मराठी भाषेच्या फॉन्टमध्ये तयार करुन सी.डी. सह सादर करावेत.** सदर प्रस्तावांचे अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यानुसार विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

२) प्रस्ताव संस्थेच्या / महाविद्यालयाच्या कव्हरींग लेटरसह सादर करावा. तसेच भरलेल्या संलग्नता शुल्काचा तपशील कव्हरींग लेटरवर व प्रस्तावात नमूद करावा. (उदा. संलग्निकरण शुल्क, धनादेश क्रमांक, पावती क्रमांक व दिनांक) प्रस्तावाच्या फाईलच्या मुखपृष्ठावर महाविद्यालयाचे नाव, अभ्यासपाठ्यक्रम, प्रस्ताव कशासाठी आहे (नवीन महाविद्यालय, विद्याशाखा, विषय, अभ्यासपाठ्यक्रम, तुकडी वाढ, संलग्निकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार / निरंतर संलग्निकरण) व कोणत्या शैक्षणिक वर्षासाठी आहे, याचा स्पष्ट उल्लेख करावा. अन्यथा प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

३) नवीन अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी, संलग्निकरणाचा विस्तार (विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढ) / संलग्निकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार आणि निरंतर संलग्निकरण याकरिता प्रस्ताव स्वतंत्र शुल्कासह सोबतच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे पूर्ण माहिती भरुन विद्यापीठाकडे (A४) पेपर साईजमध्ये सादर करावेत, अन्यथा एकत्रित केलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्जामधील संलग्निकरणाचे नुतनीकरण अथवा नैसर्गिक विस्तारासाठी मागणी केलेले सक्तीचे व ऐच्छिक विषय तसेच इंटर-डिसीप्लीनरी विषय यांची मांडणी व्यवस्थितपणे नवीन अभ्यासपाठ्यक्रम पाहून करावी. चुकीचा पाठयक्रम / विषय भरलेला अर्ज शासनाकडे शिफारस केला जाणार नाही. उशिरा आलेल्या प्रस्तावांवर शासन विचार करीत नसल्याने असे प्रस्ताव शासनाकडे पाठविले जाणार नाहीत, याची कृपया दखल घ्यावी व त्याबाबत विद्यापीठाशी पत्रव्यवहार करु नये.

४) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांचे (नवीन विषय / अतिरिक्त तुकडी / नवीन विद्याशाखा / नैसर्गिक विस्तारासाठीचे) नवीन प्रस्ताव सादर करताना पाच प्रतीत सादर करावेत.

५) शासनाने कळविलेल्या मुद्याबाबत अर्जात माहिती स्पष्टपणे नमूद करावी अन्यथा शासनाकडून संबंधित माहिती अभावी एखाद्या अभ्यासपाठ्यक्रम / विषयाची मान्यता नाकारल्यास त्यास सर्वस्वी महाविद्यालय जबाबदार राहील.

*** संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचे तसेच विस्ताराचे प्रस्ताव पाठविताना खालील सूचना लक्षात घ्याव्यात.**

**१. संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव :-**

केवळ संलग्निकरणाचे नुतनीकरण मागणाऱ्या महाविद्यालयांची संबंधित अभ्यासपाठ्यक्रमाची व त्याखालील विषयांची मुदत केव्हा संपते हे विद्यापीठाकडून आलेल्या मंजुरीच्या आदेशावरुन पडताळून पाहणे ही त्या महाविद्यालयाची जबाबदारी आहे. महाविद्यालयांच्या ज्या अभ्यासपाठ्यक्रमाकरिता, विषयाकरिता पूर्वीपासून संलग्निकरण देण्यात आलेले आहे, परंतु २०२४-२५ या वर्षामध्ये

संलग्निकरणाचा कालावधी संपत असल्यामुळे २०२५-२०२६ पासून मुदत वाढवावयाची आहे, असे प्रस्ताव पाठविताना त्या प्रत्येक विषयाकरिता प्रत्येक वर्गात मागील तीन वर्षाची विद्यार्थी संख्येची माहिती देण्यात यावी असे प्रस्ताव स्वतंत्र वर्गवारी करुन पाठविण्यात यावेत.

**प्रस्तावासोबत महाविद्यालयांच्या पाठ्यक्रमाकरिता विद्यापीठाने संलग्निकरणाची मान्यता दिलेल्या पत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.**

२. संलग्निकरणाच्या विस्ताराचे प्रस्ताव :-

नवीन विषय / अभ्यासपाठ्यक्रम, नवीन विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या महाविद्यालयामध्ये सन २०२५-२०२६ पासून सुरु करावयाचे आहेत, असे प्रस्ताव **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या बृहत आराखड्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई यांच्या शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/ (२०८/१७) / मशि - ४, दि. १३/०९/२०१७ नुसार प्रस्ताव सादर करावेत.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९(घ) अन्वये शासनाची प्राथमिक मान्यता न घेता महाविद्यालयांनी कोणताही विषय / अभ्यासपाठ्यक्रम / तुकडी नव्याने सुरु करु नये. तसेच शासनाकडे विद्यापीठाने प्रस्ताव पाठविल्यानंतर तो मंजूर होईलच असे गृहीत धरुन काही महाविद्यालये नवीन विषय / अभ्यासपाठ्यक्रम / तुकडी सुरु करतात. तसेच शासनमान्य तुकडीपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देतात. शासनाच्या व विद्यापीठाच्या परवानगीशिवाय असे विषय/अभ्यासपाठ्यक्रम/तुकडी सुरु केल्यास सदरच्या विषयास/अभ्यासपाठ्यक्रमास/तुकडीस प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षा व पात्रता फॉर्म स्वीकारले जाणार नाहीत व त्याची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयावर राहील, यांची कृपया नोंद घ्यावी.**

३. संलग्निकरणाच्या नुतनीकरणासाठी अर्ज करणाऱ्या संलग्न महाविद्यालयांनी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०८ ते ११९ अन्वये घालून दिलेल्या सर्व तरतुदींच्या उद्दिष्टांबाबत परिपूर्तता करणे आवश्यक आहे. तसेच निरंतर संलग्निकरणासाठी अर्ज करताना कलम ११६ मधील तरतूदी व अनुषंगिक परिनियमातील पूर्तता केली पाहिजे.

४. अर्जात अभ्यासपाठ्यक्रमाची व त्याखालील विषयांची मराठीत मांडणी करताना त्याचे इंग्रजी पर्यायी शब्द द्यावेत.

५. इतर स्थानिक महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या विषयांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्या विषयांची विस्तारासाठी मागणी करु नये. अथवा संबंधित महाविद्यालयांनी परस्पर विचार विनिमय करुन विषयांची विभागणी करुन त्यांची मागणी करावी व तसे संमतीपत्र सोबत जोडावे अन्यथा बदलेल्या परिस्थितीत त्यास शासनाची मान्यता मिळणार नाही. जादा विषयासाठी मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण संचालनालय) यांची पूर्वपरवानगी घेण्यासाठी तसेच जादा तुकड्या किंवा जादा शिक्षकांच्या नेमणुकीस विद्यापीठाची परवानगी घेण्यासाठी केलेल्या अर्जाची प्रत सोबत जोडावी. शासनाकडून ज्या अभ्यासपाठ्यक्रमास/विषयास संमती मिळेल, त्याबाबत स्थानिक चौकशी समिती नेमण्यात येईल. तरी आपला अर्ज प्राथमिक छाननीसाठी शासनाकडे पाठविण्यासाठी नेमून दिलेल्या तारखेपूर्वीच तो या कार्यालयास पोहोचेल याची दक्षता घ्यावी.

---

# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

## Academic, Research and Development

❖ **Under Graduate Courses fee as per ordinance no 130 (i) & 130 (A) and Post Graduate fee as per ordinance No. 151 New affiliation / Continuation / Extension of affiliation & Permanent affiliation is as follows**

| Sr.No. | Faculty / Courses Proposed | New Affiliation Fee Rs. | New Subject Fee Rs | Natural Extension Fee Rs. | Additional Division Fee Rs. | New Course Fee Rs. | Continuation of Affiliation Fee Rs. | Permanent Affiliation Fee Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Arts / Commerce / Science | 15,000 /- | 1000 /- per subject | Rs. 2000/- up to 5 subjects & each additional subject Rs 500 /- | Rs. 2000/- up to 5 subjects & each additional subject Rs 500 /- | 15,000 /- | 500/- per subject | 15,000 /- |
| 2. | Any Two Faculty | 25,000 /- | 1000 /- per subject | Rs. 2000/- up to 5 subjects & each additional subject Rs 500 /- | Rs. 2000/- up to 5 subjects & each additional subject Rs 500 /- | 15,000 /- | 500/- per subject | 25,000 /- |
| 3. | Arts, Commerce & Science | 35,000/- | 1000 /- per subject | Rs. 2000/- up to 5 subjects & each additional subject Rs 500 /- | Rs. 2000/- up to 5 subjects & each additional subject Rs 500 /- | 15,000 /- | 500/- per subject | 25,000 /- |
| 4. | B.C.A. / B.B.A / DBM / BSW | 30,000 /- | --- | 15,000/- | 15,000/- | 30,000/- | 15,000/- | 30,000/- |
| 5. | B.Sc. ( ECS) | 30,000 /- | --- | 15,000/- | 15,000/- | 30,000/- | 15,000/- | 30,000/- |
| 6. | Education ( B.Ed., M.Ed., B.P.Ed, M.P.Ed, B.A.B.Ed (Integrated) , B.Sc.B.Ed (Integrated) ) | 50,000 /- | --- | 20,000 /- | 20,000/- | 50,000/- | 20,000/- | 50,000/- |
| 7. | B. Pharmacy | 50,000 /- | --- | 15,000 /- | 15,000/- | 50,000/- | 15,000/- | 50,000/- |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| Sr.No. | Faculty / Courses Proposed | New Affiliation Fee Rs. | New Subject Fee Rs | Natural Extension Fee Rs. | Additional Division Fee Rs. | New Course Fee Rs. | Continuation of Affiliation Fee Rs. | Permanent Affiliation Fee Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8. | B.Tech (Engineering) / M.Tech (Engineering) | 2,00,000/- | 25,000 /- Per Branch | 25,000/- Per Branch | 25,000 /- Per Branch | 2,00000/- | 20,000/- Per Branch | 2,00000/- |
| 9. | MCA / MBA / MSW | 50,000/- | --- | 20,000 /- | 20,000/- | 50,000/- | 20,000/- | 50,000/- |
| 10. | MA. / M.Com | 10,000/- | 10,000/- Per Subject | 5,000/- | 5,000/- | 10,000/- | 5,000/- | 25,000/- |
| 11. | M.Sc. | 20,000/- | 10,000/- Per Subject | 10,000/- | 10,000/- | 20,000/- | 10,000/- | 25,000/- |
| 12. | M.Phil / Ph.D. Lab Recognition | 7500 /- | 7500 /- Per Subject | --- | --- | 7,500 /- | 5,000 /- | 10,000 /- |
| 13. | L.L.B. / B.A.L.L.B / L. L.M | 50,000 /- | --- | 15,000 /- | 15,000 /- | 50,000/- | 15,000/- | 30,000/- |
| 14. | B.Sc. Bio-Technology<br>BFT<br>Hostility Studies<br>Hotel Management<br>B.Sc. Entrepreneurship /<br>M.Sc. Entrepreneurship | 50,000/- | --- | 15,000 /- | 15,000/- | 50,000/- | 20,000/- | 50,000 /- |
| 15. | P.G.D.C.A. | 25,000 /- | --- | --- | --- | 25,000/- | 10,000 /- | 25,000/- |
| 16. | UGC Career Oriented Course | 5,000 Certificate | --- | 1,000/- Advance Diploma | -- | 5,000 /- | 8,000/- Diploma | – |

| Sr.No. | Faculty | Degree | College / Courses Proposed | New Affiliation Fee Rs. | New Subject Fee Rs. | Natural Extension Fee Rs. | Additional Division Fee Rs. | New Course Fee Rs. | Continuation of Affiliation Fee Rs. | Permanent Affiliation Fee Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 17. | Fine Art's | B.A.(Music ) | College of Music | 15,000 /- | 1,000/- Per Subject | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500/- | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500 /- | Rs. 15,000 /- | 500 /- per subject | 15,000 /- |
| 18. | Fine Art's | B.F.A | College of Fine Arts | 15,000 /- | 1,000/- Per Subject | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500 /- | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500 /- | Rs. 15,000 /- | 500 /- per subject | 15,000 /- |
| 19. | | | P.G. Diploma Courses | 25,000/- | ---- | ------ | --- | 25,000/- | 10,000/- | 25,000/- |
| 20. | | B.A. (Spiritual Study) | College of Spiritual Study | 15,000 /- | 1,000/- Per Subject | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500 /- | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500 /- | Rs. 15,000 /- | 500 /- per subject | 15,000 /- |
| 21. | Science | B.Sc. B.Voc | B.Sc. Food Processing | 15,000 /- | 1,000/- Per Subject | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500 /- | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500 /- | Rs. 15,000 /- | 500 /- per subject | 15,000 /- |

| Sr.No. | Faculty | Degree | College / Courses Proposed | New Affiliation Fee Rs. | New Subject Fee Rs. | Natural Extension Fee Rs. | Additional Division Fee Rs. | New Course Fee Rs. | Continuation of Affiliation Fee Rs. | Permanent Affiliation Fee Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 22. | Social Sciences | B.J.M.C | B.J.M.C | 15,000 /- | 1,000/- Per Subject | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500 /- | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500 /- | Rs. 15,000 /- | 5,000/- | 15,000 /- |
| 23. | Social Sciences | B.Lib , M.Lib, ISC | B.Lib , M.Lib, ISC | 15,000 /- | 1,000/- Per Subject | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500 /- | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500 /- | Rs. 15,000 /- | 5,000 /- | 15,000 /- |
| 24. | Science | B.Sc. | B.Sc. Industrial Chemistry | 15,000 /- | 1,000/- Per Subject | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500 /- | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500 /- | Rs. 15,000 /- | 500 /- per subject | 15,000 /- |
| 25. | Science / Enggi | B. Text | Bachelor of Textile | 50,000/- | ---- | 20,000/- | 20,000/- | 50,000/- | 20,000/- | 50,000 /- |
| 26. | Pharmacy | M. Pharma | M. Pharmacy | 50,000 /- | ----- | 15,000/- | 15,000/- | 50,000/- | 15,000/- | 50,000/- |
| 27. | Science | M.Sc. Bio- Tech | M.Sc. Bio-Technology | 50,000/- | --- | 15,000/- | 15,000/- | 50,000 /- | 20,000/- | 50,000/- |

| Sr.No. | Faculty | Degree | College / Courses Proposed | New Affiliation Fee Rs. | New Subject Fee Rs. | Natural Extension Fee Rs. | Additional Division Fee Rs. | New Course Fee Rs. | Continuation of Affiliation Fee Rs. | Permanent Affiliation Fee Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 28. | Engineering | B.Architecture/ M.Architecture | Architecture College | 200000/- | 25,000/- | 25,000 /- | 25,000/- | 20,000/- | 20,000/- | 2,00,000/- |
| 29. | Science | B.Sc. (Home Science) | College of Home Science | 15,000 /- | 1,000/- Per Subject | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs 500 /- | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500 /- | Rs. 15 000 /- | 500 /- per subject | 15,000 /- |
| 30. | Commerce | B.HMTC | College of Hotel Management & Catering Technology | 50,000/- | --- | 20,000/- | 20,000/- | 50,000/- | 20,000/- | 50,000/- |
| 31. | Commerce | MFM | Master of Financial Management | 50,000/- | --- | 20,000/- | 20,000/- | 50,000/- | 20,000/- | 50,000/- |
| 32. | | B. Voc. | Skill Diploma (any subject) | 10,000/- | 500/- Per subject | 1000/- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500 /- | 1000/- up to 5 Subject & Each additional Subject Rs. 500 /- | 10,000/- | 300/- Per subject | 10,000/- |
| 33. | | | Skill Development (Certificate any subject) | 5,000/- | 200/- | 500/- & 100/- | 500/- & 100/- | 5000/- | 150/- Per subject | 5,000/- |

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - 413 255, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७०/७१/७२/७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: affiliation@sus.ac.in विस्तारित क्र.: १२२




**संलग्नता विभाग**

**वाचा :** १) मा. कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे दिनांक १४/०६/२०२४ रोजीच्या ई-मेल अन्वये प्राप्त पत्र क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१००/विशि-२, दिनांक १४/०६/२०२४.

२) मा. उप सचिव (कराधान), वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे दिनांक १४/०६/२०२४ रोजीच्या ई-मेल अन्वये प्राप्त पत्र क्र. संकीर्ण-२०२४/अनौ सं.क्र.०१/कराधान-१, दिनांक २९/०४/२०२४.

३) मा. सह आयुक्त राज्य कर विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक १४/०६/२०२४ रोजीच्या ई-मेल अन्वये प्राप्त पत्र क्र. JCHQ-१/(AR-५)/GST/Affiliation fee/ADM-८/B-०९, दिनांक २४/०४/२०२४.

४) मा. प्र. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ यांची दिनांक १०/०७/२०२४ रोजीची अंतर्गत कार्यालयीन टिपणी.

## परिपत्रक

संदर्भ क्र. २ व ३ च्या अनुरोधाने संदर्भ क्र. १ अन्वये कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या दिनांक २४/०८/२०२३ रोजीच्या पत्राचा संदर्भ देवून संलग्नता शुल्कावरील वस्तू आणि सेवा कर (GST) मधून सूट मिळण्याबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने प्रस्ताव वित्त विभागास (महाराष्ट्र शासन) सादर केला असता, सदरहू अहवालाची तपासणी करुन संलग्नता शुल्कावरील वस्तु आणि सेवा कराबाबत सुट नसल्याचे दिसून येत आहे, असे नमूद करुन सदरहू अहवाल पुढील कार्यवाहीस्तव सर्व अकृषी विद्यापीठांना सोबत जोडून पाठविले आहे. तसेच संदर्भ क्र. ४ अन्वये वित्त व लेखा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांनीही या संदर्भात वस्तू व सेवाकर कार्यालय, सोलापूर यांचेकडून सन २०१७-१८ पासून जमा संलग्नता शुल्कावर १८% वस्तू आणि सेवा कर (GST) भरणेबाबत नोटीस प्राप्त झाल्याचे कळविले आहे.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांनी राज्यकर विभागाकडून मागविलेल्या अहवालानुसार संलग्नता शुल्कावरील वस्तू व सेवा कर भरण्याबाबतच्या महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र. १ अन्वये दिलेल्या सूचनेनुसार संलग्नता शुल्काच्या रक्कमेवर १८% वस्तू व सेवा कर (GST) ची अतिरिक्त रक्कम विद्यापीठाकडे भरणा करण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी. तसेच ज्या महाविद्यालयांनी दिनांक ०१/०४/२०२४ नंतर मागील व चालू शैक्षणिक वर्षाची संलग्नता शुल्क भरणा केलेली आहे, अशा महाविद्यालयांनीही संबंधित शुल्काच्या रक्कमेवरील १८% वस्तू व सेवा कर (GST) विद्यापीठाकडे भरणा करण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

आदेशावरुन/-

( डॉ. उ. वि. मेटकरी )

उपकुलसचिव

जा. क्र. : पुअहोसोविसो/संलग्नता/जीएसटी/२०२४-२५/ 5043

दिनांक : 12 JUL 2024

सोबत : वरीलप्रमाणे

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/सचिव, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत: वित्त व लेखा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.